**पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी भाडयाने घेण्यात येणा-या खाजगी टँकर्स व ट्रक्सच्या दराबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : टंचाई-३०००/ प्र.क्र. ८७ / पा पु. -१४**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ नोव्हेंबर, २०००**

**संदर्भ :-**१. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक : एसडीडब्ल्यू-३३९७ / प्र.क्र.९९ / म-७ दि. २ जून, १९९८.
२. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक : ३०९९ / प्र.क्र. ३५/ पापु-१४, दि. ०१ एप्रिल, १९९९.
३. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक : ३०९९ / प्र.क्र.३५ / पापु-१४ , दि. २३ मार्च, २०००
४. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक : ३०९९/ प्र.क्र. १३/ पापु-१४, दि. ०१ फेब्रुवारी, १९९९.

**प्रस्तावनाः-**

पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या भागात टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो. मात्र टँकर व ट्रक्सव्दारे होणारा पाणी पुरवठा हा अत्यंत खर्चिक असल्याने अत्यावश्यक असलेल्या ठिकाणीच अशाप्रकारे पाणी पुरवठा करण्यात यावा व शक्यतो शासकीय टँकर्सचा वापर करावा असे आदेश वेळोवळी जिल्हाधिका-यांना निर्गमीत करण्यात आले आहेत. तथापि उन्हाळयात शासकीय टँकर्स अपुरे पडतात त्या वेळी खाजगी टँकर्स भाडयाने घ्यावे लागतात. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी भाडयाने घ्यावयाच्या खाजगी टँकर्स व ट्रक्सचे दर संदर्भ क्रमांक १ ते ३ येथील शासन निर्णयान्वये सुधारित करण्यात आले आहेत. जानेवारी २००० व सप्टेंबर २००० पासून डिझेलच्या दरात वाढ झाल्याने व वाहनांच्या सुटया भागांच्या किंमतीत झालेली वाढ विचारात घेऊन खाजगी टँकर्स व ट्रक्सच्या दरात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी भाडयाने घ्यावयाच्या खाजगी टँकर्स व ट्रक्सचे संदर्भ क्र.१,२,३ व ४ मध्ये नमुद केलेले दर या शासन निर्णयाच्या दिनांकापासून खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत.



३८५

| टँकरची क्षमता | प्रति दिन भाडे (रुपये) | प्रति किलोमीटर भाडे (रुपये) |
|---|---|---|
| ७.५ मे. टन | ८०६.४० | ७.३३ |
| १० मे. टन | १०७५.२० | ९.७८ |
| १२ मे. टन | १२९०.२४ | ११.७३ |
| **खाजगी ट्रक्सचे दर** | ७५८.२४ | ७.२५ |

२. खाजगी टँकर्स व ट्रक्सच्या मालकांबरोबर हा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी करार केले असतील तर करारनाम्यातील दर उपरोक्त सुधारित आदेशांनुसार निश्चित करण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात येत आहेत.

३. हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सुधारित दराने भाडे देण्यात जिल्हाधिका-यांना या निर्णयाव्दारे परवानगी देण्यात येत आहे.

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८५४/२०००/ व्यय-३ दि. ०६ नोव्हेंबर, २००० अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

**(शं. गो. भोईर)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
विभागीय आयुक्त (सर्व).
जिल्हाधिकारी (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य. मुंबई/ नागपूर
महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
वित्त विभाग, व्यय-३
व-१ / म-११/म-७ कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय , मुंबई.
निवडनस्ती पापु-१४.



3CC